Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १८० वा ❑ भारतीय सौर दिनांक १० भाद्र. शके १९४८, मंगळवार दि.०१ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

# जगाची गरज ओळखून व्यवसाय करा

## सुतार समाज गुणगौरव सोहळ्यात विनोद जैतमहाल यांचे आवाहन

ज्योतिर्मय साहित्य

जालना - लोकांच्या कोणत्या समस्या सोडवता येतील याचा विचार करून आणि जगाची गरज ओळखून व्यवसाय करावा, असे आवाहन जालना येथील कवी, लेखक व नाट्यकलावंत विनोद जैतमहाल यांनी विद्यार्थ्यांना केले.

जालना जिल्हा सुतार समाज समन्वय समितीच्या वतीने ३० ऑगस्ट रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित गुणवंतांच्या सत्कार सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ, समन्वयक डॉ. श्रीकृष्ण सोनुने, प्रमुख मार्गदर्शक पुणे येथील डी. वाय. पाटील संस्थेचे संचालक प्रा. विद्यानंद मानकर, प्रा. नागोजीराव पांचाळ, संजय बोराडे, सतीश शिंदे, भगवान राऊत, हेमंत जाधव, पत्रकार भागवत पांचाळ, समितीचे जालना जिल्हाध्यक्ष राजेश भालेकर, श्यामराव जाधव आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.




विनोद जैतमहाल पुढे म्हणाले की, नव्या पिढीने निर्व्यसनी राहून करिअर घडवावे. बाजारात उभे राहून पैसे कमावण्याची क्षमता अंगी असेल तर कुठल्याही आरक्षणाची किंवा अनुदानाची वाट पाहावी लागत नाही. त्यासाठी आपल्या कौशल्यांना धार लावावी. सतत नवी कौशल्ये शिकावी.

प्रा. विद्यानंद मानकर या वेळी म्हणाले की, सुतार समाजाला शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आम्ही कार्यरत आहोत. तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी मध्यवर्ती ठिकाणी अभ्यासकेंद्रही लवकरच सुरू करण्यात येईल.

प्रा. नागोराव पांचाळ यांनी करिअरच्या विविध दिशा स्पष्ट केल्या. प्लास्टिक इंजिनिअरिंग, वस्त्रोद्योग, ॲनिमेशन अशा विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. श्रीकृष्ण सोनुने यांनी कृषी क्षेत्रातील विविध संधींची माहिती देऊन महिला सक्षमीकरणाची गरज व्यक्त केली.

या प्रसंगी आपापल्या क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या समाजबांधवांचा सत्कार करण्यात आला. यात कुंभारझरी येथील वारकरी धर्मसंकीर्तन प्रतिष्ठानच्या दिंडीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्वच्छ दिंडी द्वितीय पुरस्कार मिळाल्याबद्दल ह.भ.प. सोनुने गुरुजी, मानसिक आरोग्य क्षेत्रातील प्रा. डॉ. सुजाता देवरे, जालना पोलिस प्रशिक्षण केंद्राचे सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र मनोहरराव बोराडे, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख अशोक रामचंद्र इंगळे यांचा समावेश होता.

या वेळी अशोक इंगळे, भगवान सांगुळे, एल. डी. सोनुने, भिकनराव हिवाळे, पंडितराव दांडगे, सौ. छाया जाधव, विनोद काळे आदींची उपस्थिती होती.

प्रारंभी भागवत कदम यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. दरम्यान संत भोजलिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळाच्या रु. १ लाखांच्या बिनव्याजी योजनेचे फॉर्म कार्यक्रमस्थळी १ रुपयात भरुन देण्यात आले. आयोजनासाठी समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शत्रुघ्न सुरासे व प्रा. विजय सुरासे यांनी केले, आभारप्रदर्शन विलास पवार यांनी केले.

## विशेष लेख...

### समृद्धी महामार्ग की लुटारूंचा मार्ग?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा मुंबई आणि नागपूरला जोडणारा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. मात्र, हा मार्ग सुरू झाल्यापासून तो समृद्धी महामार्ग की लुटारूंचा मार्ग? या वादात अडकला आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग हा मृत्यूचा महामार्ग म्हणून ओळखला जात असतानाच आता हा महामार्ग लुटारूंचा महामार्ग बनत चालला आहे.समृद्धी महामार्गावर अलीकडे घडलेल्या लुटमारीच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये चिंतेचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ऑगस्ट २०२६ च्या अखेरच्या आठवड्यात नाशिकमधील सिन्नर आणि वैजापूर परिसरामध्ये दरोडेखोरांनी धुमाकूळ घातल्याच्या अत्यंत धक्कादायक घटना समोर आल्या आहेत. यामुळे या अतिवेगवान मार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

समृद्धी महामार्गावर गेल्या काही दिवसांत लुटमारीच्या आणि दरोड्याच्या अत्यंत गंभीर घटना समोर आल्या आहेत, ज्यामुळे प्रवाशांमध्ये मोठ्या प्रमाणावर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या महामार्गावर लूटमार करण्यासाठी दरडखोर वेगवेगळ्या क्लुप्त्या आणि युक्त्या योजत आहे.रात्रीच्या वेळी महामार्गावर मुद्दामहून खिळे किंवा टोकदार लोखंडी वस्तू टाकल्या जातात. गाडी पंक्चर होऊन थांबताच अंधारातून टोळी बाहेर येते आणि प्रवाशांना लुटतात. दिवसाढवळ्या चालणाऱ्या गाड्यांचा पाठलाग करून, ''तुमच्या गाडीला मागे काहीतरी झाले आहे'' किंवा ''आम्हाला मदतीची गरज आहे'' असा बनाव करून गाड्या थांबवल्या जातात. काही घटनांमध्ये लुटारू ३-४ आलिशान गाड्यांचा वापर करून प्रवाशांच्या वाहनाला तिन्ही बाजूंनी घेरतात आणि वेग कमी करण्यास भाग पाडतात.शिवाय चालत्या वाहनांवर अचानक दगडफेक करून चालकाचे नियंत्रण विचलित केले जाते जेणेकरून त्याने गाडी थांबवावी.गाडी थांबताच दबा धरुन बसलेले लुटारू प्रवाशांना मारहाण/ धाकट पडशा दाखवून लुटमार करतात.

कुटुंबाला मारहाण, १८ लाखांचा ऐवज लांबवला

गुरूवारी (२७/८/२६)मध्यरात्री १२:०० च्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथील एक कुटुंब कारने मुंबईच्या दिशेने जात होते. रस्त्यावर टाकलेल्या लोखंडी वस्तूंमुळे कारचे टायर फुटले. गाडी थांबताच दबा धरून बसलेल्या १० ते १२ जणांच्या टोळक्याने वाहनाला चारी बाजूंनी वेढा घातला. लुटारूंनी लोखंडी रॉड आणि दांडक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली व वाहनातील लहान मुलांना बाहेर खेचण्याचा प्रयत्न केला. या भीषण दहशतीमुळे घाबरलेल्या कुटुंबीयांनी अंगावरील सोन्याचे दागिने, घड्याळे आणि ८४ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम असा एकूण १८ लाख ९ हजार ५०० रुपयांचा ऐवज दरोडेखोरांच्या स्वाधीन केला.

दगडफेक अन् हवेत २ राऊंड फायर

यानंतर लुटारूंनी हिंगोलीच्या एका वाहनावर दगडफेक करत लूटमार केली, तर एका वाहनचालकाने प्रसंगावधान राखून कारचा वेग वाढवल्याने तो सुखरूप बचावला. त्यानंतर मध्यरात्री १.४० वाजेच्या सुमारास मुंबईहून नांदेडकडे परतणारे वाहन व्यावसायिक यांच्या कारचे टायरही खिळे टाकून फोडण्यात आले. कार थांबताच हातात धारदार हत्यारे घेतलेले १२ ते १३ दरोडेखोर चालकाच्या दिशेने धावले. मात्र, चालकाने तातडीने स्वतःजवळील रिव्हॉल्व्हरमधून हवेत २ राऊंड फायर केले. गोळीबाराच्या आवाजाने घाबरून लुटारूंनी महामार्गावरून खाली उड्या मारून पळ काढला.


या घटनांची गंभीर दखल घेत महामार्ग पोलीस आणि स्थानिक पोलिस महामार्गावर २४ तास पेट्रोलिंग (गस्त) वाढवलीअसली तरी लूटमार सुरूच आहे.

महामार्गावरून प्रवास करण्यासाठी आकारला जाणारा टोल इतर रस्त्यांच्या तुलनेत खूप जास्त आहे. पूर्ण प्रवासासाठी (मुंबई ते नागपूर) हजारो रुपये मोजावे लागतात. महामार्गावरील फूड प्लाझा आणि पेट्रोल पंपांवर वस्तूंच्या किमती बाजारभावापेक्षा खूप जास्त असल्याच्या तक्रारी प्रवाशांनी केल्या आहे.वेगमर्यादा जास्त असल्यामुळे टायर फुटणे, गाडीवरील नियंत्रण सुटणे आणि वन्य प्राण्यांशी होणारी धडक यांमुळे येथे अनेक गंभीर अपघात झाले आहेत. त्यामुळे याला काही जण मृत्यूचा मार्ग म्हणतात. पायाभूत सुविधांची कमतरता सुरुवातीच्या काळात अनेक किलोमीटरपर्यंत नेटवर्क नसणे, पंक्चर काढण्याची दुकाने नसणे किंवा तातडीची वैद्यकीय मदत मिळण्यात अडचणी येत होत्या

थोडक्यात सांगायचे तर, हा महामार्ग महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि समृद्धी आणणारा प्रकल्प आहे. परंतु, टोलचे उच्च दर, खाजगी क्रेन चालकांची मनमानी आणि सुरक्षेच्या अपुऱ्या उपाययोजनांमुळे सामान्यांमध्ये याबद्दल काहीशी नाराजी आहे. शासनाने या त्रुटी तातडीने दूर केल्यास हा मार्ग खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांसाठी समृद्धीचा ठरेल.

# मृत्युंजयकारांचा जन्मदिन

ज्योतिर्मय साहित्य




संतोष भोसेकर

मराठी साहित्याचा शेलका साज लेवून जन्माला आलेले सिद्धहस्त लेखक साहित्यिक शिवाजी सावंत यांचा आज जन्मदिन.

३१ ऑगस्ट १९४० ला एका साध्या शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. आजऱ्याच्या लाल मातीत ते मोठे झाले. वाढले. आईच्या संस्कारातून त्यांना ऐतिहासिक आणि पौराणिक लिखाणाचा वारसा लाभला. अभ्यासाबरोबरच खेळाची, व्यायामाची त्यांना मनापासून आवड होती. नदीत तासंतास पोहणे हा त्यांचा छंद होता. तर कबड्डीमध्ये ते राष्ट्रीय पातळीवरील गाजले होते. आठवीत शिकत असताना माझं ध्येय या विषयावर निबंध लिहिताना मला लेखक व्हायचंय हा निबंध त्यांनी लिहिला होता.

भारतीय जीवन आणि संस्कृती याबद्दल त्यांना प्रथम असं सार्थ अभिमान होता.शिवाजी सावंत यांचे भाषा प्रभुत्व म्हणजे कुबेराचा खजिना होता. त्यांनी आपल्या हयातीत मोजकच लिहिलं पण ते वेचक होते. शिवाजी सावंत नववीत असताना त्यांनी मित्राच्या सहाय्याने शि.म.परांजपे यांनी लिहिलेले ''अंगराज कर्ण'' ही एकांकिका स्नेहसंमेलनात सादर केली. त्यांनी त्यात श्रीकृष्णाची भूमिका केली. पण त्यांच्या मनात घट्ट रुतून बसले ते कर्ण चे संवाद. त्यामुळे ते अस्वस्थ झाले. अंतर्मुख झाले. शाळकरी वयापासूनच कर्ण हा त्यांच्या चिंतनाचा विषय बनला. आणि कळत नकळत मृत्युंजय या महा कादंबरीचे बीज त्यांच्या मनात रुजलं.''मृत्युंजय'' या कादंबरीने मराठी साहित्य विश्वातील अनेक विक्रम मोडले. कादंबरीच्या लिखाणासाठी प्रत्यक्ष महाभारत जिथे घडलं त्या कुरुक्षेत्रावर जाऊन येण्याचे ठरवलं. पण प्रश्न पैशाचा होता. त्यांची अडचण समजून पहिला सव्वाशे रुपयाचा चेक चित्रतपस्वी भालजी पेंढारकर यांनी त्यांना दिला. त्यामुळे सावंत कुरुक्षेत्रावर महिनाभर मुक्काम करून अनेक संदर्भ तपासून अवघ्या तीन महिन्यात पंधराशे पानाचे हस्तलिखित पूर्ण करून त्यांनी ही साहित्यकृती प्रकाशित केली. कादंबरीच्या हस्तलिखिताचे पूजन महाराष्ट्राचे वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांच्या हस्ते झाले. जनमान्यतेचे अफाट विक्रम प्रस्थापित करणारी शिवाजीरावांची ही महाकादंबरी त्यांच्या वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी प्रकाशित झाली. त्यांच्या पहिल्याच कादंबरीला अमाप लोकप्रियताला लाभली ती आजवर कुठल्याही मराठी कादंबरीच्या पहिल्या कादंबरी लाभलेली नाही. साहित्याच्या नोबेल पुरस्कारासाठी १९९० साली कोलकत्याहून या कादंबरीचे नामांकन झाले होते. डॉ. पु. ग.सहस्त्रबुद्धे यांनी केसरीमध्ये मृत्युंजय या कादंबरीवर समीक्षा लेख लिहिला होता. महाभारताचे तेज सूर्य इतके प्रखर आहे. जसे सूर्याच्या जवळपास जाणे कठीण आहे तसेच या ग्रंथाच्या जवळपास जाणे धाडसाचे होईल म्हणून त्यांनी कौतुक केले. आचार्य अत्रे यांनी मराठा मध्ये अग्रलेख लिहून या कादंबरीचे तोंड भरून कौतुक केले आणि त्यांना ''मृत्युंजयकार'' ही उपाधी दिली. मृत्युंजय ही हिंदी, कन्नड, गुजराती, ओडिया, मल्याळम, बंगाली, तेलगू राजस्थानी, इंग्रजी अशा दहा भाषांत अनुवादित झाली आहे. अनेक भाषांची शिखरं आणि मानसन्मान मृत्युंजयने पादाक्रांत केले .

भगवान श्रीकृष्णांच खोलवर चिंतन करून ''युगंधर'' ही अद्वितीय कादंबरी त्यांनी लिहिली. युगंधरच्या मनोगताला त्यांनी आचमन हे शीर्षक दिले. गेली पाच हजार वर्षे भारतीयांच्या व्यक्त-अव्यक्त मनाचा तळठाव व्यापून दशांगुळे शेष उरलेली एक सशक्त व्यक्तिरेखा, एक युगपुरुष म्हणजे युगंधर अर्थात श्रीकृष्ण. या कादंबरीला साहित्य अकादमीतर्फे सन्मानित करण्यात आले होते. मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करून छत्रपती संभाजी महाराजांवर १९७९ मध्ये ''छावा'' ही कादंबरी लिहिली. कादंबरीचे अर्पणपत्रिका वाचण्यासारखी आहे. कादंबरी वाचताना मन घोड्यांच्या टापांना केव्हा बांधल जातो ते कळतच नाही.परमपूज्य श्री पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या जीवनचरित्रावर ''देह झाला चंदनाचा'' ही अप्रतिम कादंबरी लिहिली. प्रतिभासूर्याच्या लेखांचे कवडसे वाचकांना वेगळाच आनंद मिळवून देते. शिवाजी सावंत यांनी कांचनकण, मोरावळा, लढत, शेलका साज, अशी मने असे नमुने अशी इतरही अनेक पुस्तके लिहिली आहेत. महा कादंबऱ्यात त्यांच्या लेखणीचे सामर्थ्य वाचकाला भारवून टाकणार असते .त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये प्रतिभासूर्याने वाचकांना दिपवून टाकले.

भारतीय ज्ञानपीठाचा अत्यंत प्रतिष्ठेचा मूर्ती देवी पुरस्कार त्यांना मिळाला. अनेक प्रादेशिक साहित्य संमेलनाचा अध्यक्षपद त्यांनी समर्थपणे भूषवली. परंतु अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मात्र त्यांना मिळाले नाही. दोन-चार मामुली पुस्तक लिहिणाऱ्यांनी अखिल भारतीय संमेलनाचे अध्यक्ष भूषवले पण अध्यक्षपदाची अपेक्षा शिवाजी सावंत यांनी कधीही धरली नाही. अध्यक्षपद तर सदैव त्यांच्या पायतळी होतं. समीक्षकांनीही त्यांची दखल घेतली नाही पण लक्षावधी वाचकांनी त्यांना खूप मोठं केलं.

शिवाजी सावंत यांना आपल्या आजरा या गावचा अभिमान होता. त्यांनी त्यावर एक कविताही लिहिली होती..

सह्याद्रीच्या कुशीत वसले गाव चिमुकले माझे
अजर तयाच्या सौंदर्याने नाव अजरा साजे
भोळी भाबडी किती बालके या लाल मातीची
श्रमती, झिजती परीने कुढती मने लाल मातीची !!

मृत्युंजयकारांच्या लेखणीला कुठलाच विषय वर्ज्य नव्हता .त्यांची लेखणी दिव्यत्वाचा, भव्यतेच्या दर्शनाने भरून जाते. त्यांच्या लेखणीने पुराण, इतिहास आणि वर्तमान अशा तिन्ही काळांना स्पर्श केला. मराठी कादंबऱ्यांचे दालन ऐश्वर्य संपन्न करणाऱ्या लेखकाच्या मृत्यूनंतर महाराष्ट्र भूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे म्हणाले की, '' मराठीचा अमृतरांजण आज कलंडून पडला आणि अलौकिक सामर्थ्याचा हा भाषा प्रवाह वाहून गेला''. मराठी भाषेच्या शिवाजीला विनम्र वंदन.


# कवी-लक्ष्मण गं.वाल्डे यांच्या टेलर या कवितासंग्रहाचे प्रकाशन संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

कन्नड - आयोजित तिफण लेखक -वाचक मेळावा, जामखेड ता. अंबड जि. जालना येथिल जांबुवंत गडावर टेलर या कवितासंग्रहाचे भव्य प्रकाशन करण्यात आले.




कार्यक्रमाचे उद्घाटक- जेष्ठ साहित्यिक प्रा.बसवराज कोरे अध्यक्ष - जेष्ठ ग्रामीण साहित्यिक उत्तम बावस्कर, कार्यक्रमाचे आयोजक तिफणकार प्रा. डॉ. शिवाजी हुसे, प्रा. डॉ. विजय भोसले, डॉ. अंबादास सगट, डॉ. रामचंद्र झाडे, ॲड. कृष्णा काका जाधव , अशोक दुधकर, संजय गायकवाड, संदीप ढाकणे, भरत सोनवणे, श्रीराम दाबके, पेरणीकार ज्ञानेश्वर गायके, सुनील डोके, प्रमोद पठारे, हबीब भंडारे, किरण निकम, अशोक गायकवाड, सुनील उबाळे, डॉ. भानुसे, प्रा. प्रिया धारुरकर, सुनिता कपाळे, डोके मॅडम, समस्त तिफण साहित्य परिवार -कन्नड- छ. संभाजीनगर -जालना-सिल्लोड जांबुवंत गड, लेखक-वाचक मेळावा कार्यक्रमाचे आयोजक कल्याण काका खडके व समस्त टीम, समस्त जामखेड नागरिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक समस्त बंधू भगिनी या सर्वांनी प्रकाशनला उपस्थित राहून पुढील साहित्यिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विजय कुमार पांचाळ सर यांनी बहरदार संचलन करुन कार्यक्रम फुलवला , कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संदीप ढाकणे यांनी करुन कार्यक्रमाचा गोड शेवट केला...





## जात्यावरच्या ओव्या......

आज दमले दमले
गोड लागेना कुटका
केली पापड चटणी
संग ताकाचा घुटका ||८२२||

आज दमले दमले
नही करणार काम
लेक बरोबरीची
मह्या जीवाला आराम ||८२३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६९

ज्योतिर्मय साहित्य

**सुखानंदकारी निवारी भयाते ।**
**जगीं भक्तिभावे भजावे तयाते ।**
**विवेके तजावा अनाचार हेवा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।६९।।**

अर्थ : भगवंत हा सुख आणि आनंद देणारा आणि भयाचे निवारण करणारा आहे. त्याची भक्तिभावाने आराधना करावी. विवेकाच्या साहाय्याने अनाचार म्हणजे अनीतीने वागणे आणि इतरांचा हेवा किंवा द्वेष यांचा त्याग करावा. प्रभात समयी श्रीरामाचे ( भगवंताचे ) चिंतन करावे.

( सुखानंदकारी - सुख आणि आनंद देणारा, तजावा - सोडून द्यावा, अनाचार -अनीतीचे वागणे )



विवेचन : भगवंताचे गुण वर्णन करताना समर्थ म्हणतात की भगवंत हा सुख आणि आनंद देणारा आहे. सुख आणि आनंद हे शब्द आपण सामान्यपणे समानार्थी समजतो पण त्यात फरक आहे. सुख हे क्षणिक असून इंद्रिये आणि भौतिक गोष्टींवर अवलंबून असते. माणूस आयुष्यभर या सुखाच्या मागे धावत असतो. आनंद ही एक वृत्ती किंवा मानसिक अवस्था असून ती दीर्घकाळ टिकणारी आहे. ती परिस्थितीवर अवलंबून नसते. जो स्वस्वरुपी स्थिर असतो, त्याच्याकडे कायमच आनंदी वृत्ती असते. भगवंत या दोन्हींचा दाता आहे. तो सुखकर्ता आणि दुःखहर्ता आहे. दुःख हरण केल्यानंतर उरतो तो आनंद आणि सुख.

भगवंत हा भयाचे देखील हरण करतो. माणसाला या ना त्या कारणाने आयुष्यभर कुठल्यातरी भयाने पछाडलेले असते. माझा पैसा टिकेल का, मुलेबाळे मला म्हातारपणी विचारतील का ? एक ना दोन अशा अनेक चिंतांनी मनुष्य ग्रस्त असतो. पण सर्वात मोठे भय असते ते मरणाचे. भगवंत या भीतीतून देखील आपली मुक्तता करतो. जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून आपली सुटका झाली तर मृत्यूचे देखील भय नाहीच !


पण या सुखानंदकारी अशा भगवंताच्या कृपेचा अनुभव यायचा असेल तर त्यासाठी कोणती अट आहे ? ती समर्थ पुढील ओळीत सांगतात. ते म्हणतात,''जगी भक्तिभावे भजावे तयाते.'' संपूर्ण भक्तिभाव आपल्या ठायी असला पाहिजे. भक्तीभाव हा शब्द लक्षात घेण्यासारखा आहे. भक्तीमध्ये भाव हवा. तो कसा ? तर संपूर्ण ! त्यासाठी मनाने आपण त्याचे होऊन जावे. आपले सर्वस्व त्याला अर्पण करावे. भगवंत माझा आहे आणि मी भगवंताचा आहे अशी दृढ भावना आपल्या ठायी असली पाहिजे.

तुकाराम महाराज म्हणतात

नामसंकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मतारीची ।
न लगती सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ।।
ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी भगवंत आळवावा ।
रामकृष्णहरी विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ।।

भगवंत प्राप्तीसाठी वनात जाण्याची जरुरी नाही. कोणतेही कष्ट, उपासतापास करण्याची गरज नाही. आपण आहोत तेथेच त्याचे नामस्मरण करावे. मनाने त्याचेच होऊन राहावे.

(क्रमशः)






ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## ॥ संजय उवाच... ॥

@संजय काव्या पुणे 7743918559




✍ संगीत

संगीत हा एक असा छंद आहे जो आयुष्य आनंदी बनवतो, सर्व कष्ट, त्रास विसरायला लावतो. लहानांपासून ते थोरांपर्यंत सर्वांना आनंदाच्या लईत घेऊन जातो. त्यामुळे संगीतावर प्रेम करा.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## नाम हे सत्स्वरूप आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम हे रूपापेक्षा निश्चित श्रेष्ठ आहे; त्यामुळे रूपाचे ध्यान मनामध्ये आले नाही तरी नाम सोडू नये. पुढे रूप आपोआप येऊ लागेल. रूप हे जड आणि दृश्य असल्यामुळे उत्पत्ती, स्थिती आणि विनाश, वाढ होणे आणि घटणे, जागा व्यापणे आणि जागा बदलणे, कालमानाने फरक पडणे इत्यादि बंधने त्याला असतात; पण नाम हे दृश्याच्या पलीकडे आणि सूक्ष्म असल्यामुळे त्याला उत्पत्ती आणि विनाश, वाढ आणि घट, देशकालनिमित्ताच्या मर्यादा, इत्यादि कोणतेही विकार नाहीत. नाम हे सत्स्वरूप आहे. नाम हे रूपापेक्षा व्यापक असते. व्यापक वस्तूचे क्षेत्र मोठे असल्याने तिच्यामध्ये शक्तीदेखील अधिक असते. जिच्यामध्ये शक्ती जास्त असते ती वस्तू अधिक स्वतंत्र असते. जी वस्तू अधिक स्वतंत्र असते तिला बंधने किंवा मर्यादा कमी असतात. म्हणून नाम हे रूपापेक्षा अधिक व्यापक, अधिक शक्तिमान, अधिक स्वतंत्र आणि अधिक बंधनरहित असते.

आपली ज्ञानक्रिया कशी चालते ते पाहू. आपण एका टेकडीवर उभे राहून सृष्टिसौंदर्य पाहिले. त्या पाहण्यात कोणकोणत्या क्रिया होतात पाहा. प्रथम डोळ्यांमधून प्रकाश-किरणे आत गेली. बाह्य पदार्थांचे मनुष्याला ज्ञान व्हायला इंद्रिये हे पहिले साधन आहे. इंद्रियांमधून आत आलेले संस्कार एकत्र करून मन त्यांना वस्तूस्वरूप देते. वस्तूस्वरूप तयार झाल्यावर, बुद्धी सारासार विचार करून त्या वस्तूचे यथार्थ ज्ञान आपल्याला करून देते. पण मनुष्याच्या बुद्धीचा व्यापार इथेच थांबत नाही. टेकडीवरून आजूबाजूला पाहात असताना झाडे, वेली, घरे, बागा, माणसे, पक्षी, पाण्याचे तलाव इ. सर्व वस्तूंचे ज्ञान झाल्यावर पुन्हा त्यांचे एकीकरण होऊन, 'ही सृष्टीची शोभा आहे' असे ज्ञान आपल्याला होते. म्हणजे अनेकांत एकत्व शोधणे हेच मानवी ज्ञानाचे लक्षण आहे. या जगामध्ये कितीतरी वैचित्र्य आढळते. नाना तऱ्हेचे दगड, नाना तऱ्हेचे किडे, नाना प्रकारचे पक्षी, प्राणी या सर्वांची नावे जरी भिन्न असली तरी त्या सर्वांमध्ये 'असणेपणाचा' गुण आहे; म्हणजे, सजीव प्राणी झाला तरी तो 'आहे', आणि निर्जीव वस्तू झाली तरी तीही 'आहे'. एवढेच काय, पण आनंदालासुद्धा 'आहेपणा'चा गुण आहे. या 'असणेपणा'च्या गुणाला 'नाम' असे म्हणतात. यालाच 'ॐकार' असे म्हणतात. 'ॐकारांतून सर्व सृष्टी उगम पावली. ॐकार हे परमात्म्याचेच स्वरूप आहे. अर्थात, नाम म्हणजे सत् होय. म्हणूनच नाम हे सृष्टीच्या आरंभी होते, ते सध्या आहेच, आणि सृष्टीचा लय झाला तरी ते शिल्लक राहणारच. नाम म्हणजे ईश्वर होय. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. रूप हे नामाहून निराळे राहू शकत नाही. नाम हे रूपाला व्यापून पुन्हा शिल्लक उरते.

नाम हे शाश्वत आहे. ते पूर्वी टिकले, आता आहे, आणि आपण गेल्यावर ते राहणार आहे.

**

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

### ♦श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर



पुढे......
भगवान नरसिंहाचे हिरण्य कशीपुचा वध करताना अत्यंत उग्र रूप होते. त्या रूपा पुढे कोणीही जाण्यास धजावत नव्हते. पण भक्त प्रल्हादाला त्याच रूपात आधी दर्शन दिल्यामुळे, भक्त प्रल्हाद घाबरला नाही. त्याने भगवंताची प्रार्थना करून सौम्य रूप धारण करण्याची विनंती केली.
भगवान नृसिंह यांनी घेतलेले उग्र रूप प्रलयंकारी होते. ते रूप शांत होत नव्हते. तेव्हा ते तिथून निघून नीरा नरसिंगपूर येथे आले. माता लक्ष्मी यांनी भगवंताचे रूप सौम्य व्हावे म्हणून, तिथे तप केले. या तपश्चर्ये वर प्रसन्न होऊन भगवंताने इथे सौम्य रूप धारण केले.

♦कुबेराला धनप्राप्ती
माता लक्ष्मीच्या कृपेने याच स्थानावर कुबेराला धनप्राप्ती झाली.

♦राघवेंद्र स्वामीची परंपरा
मध्व संप्रदायात राघवेंद्र स्वामी हे भक्त प्रल्हादाचे अवतार मानले जातात. या श्रद्धेमुळे मंदिरात त्यांचे वृंदावन बांधण्यात आले असून, श्रावण महिन्यात इथे विशेष आराधना केली जाते. (क्रमशः)




### "एक नातं लाखमोलाचं"

मित्रांनो आणि वाचकहो, माणसाचे जीवन म्हणजे काय? आयुष्य आपल्या हातात नसतं.म्हणून गीता
असं सांगते की, हे माणसा तु फक्त निमीत्तमात्र आहेस कर्म करणे तुझ्या हातात आहे.पण इथचं माणूस हार खातो! जन्मभर माझे माझे करतो, त्यातूनच स्वार्थ वाढतो,म्हणून नातं किंवा संबंध निभावत असताना काही गोष्टी लक्षात ठेवा...
गरज म्हणून नातं कधी जोडू नका आणि सोय म्हणून कधी तोडू नका!नात्यापेक्षा भावनाचं मोल जाणनं, जपणं महत्त्वाचे आहे! मोठेपणा गर्व अंहकार यात न हरवता जीवनाच्या कोणत्याही वेळी ते जुळत असतं! व पुरेल इतकं प्रेम त्यातून मिळतं.तसेच जमेल तितके देतही जावे.. समाधानानं समजून घेतलं तर ते तडजोड असून ओझं नाही. हे सर्व समजतं जात वयानुसार, अनुभवानुसार.. म्हणून नातं नातलग हे लाखमोलाचे असतात!! विश्वासाचे चार शब्द दिले, आधाराची जाणीव करून दिली तर त्यातून दोघेही आनंदी होतात.सुखदुःखाचे तरंग हलके होतात. शांती, समाधान हे पैशाने विकत घेता येते काय?? नाही. म्हणून स्त्रीपुरुष दोघा- निही नातं जाणीवपूर्वक जपलं पाहिजे. कधी कधी मणुष्य नाही तर परिस्थिती तशी असते. आज एवढं नातंपुराण थांबून मीही थांबतो स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा.आपला दिवस सद्गुरूकृपेने आनंदी जावो सुप्रभात.



## थंड हवामान आणि तब्येती मध्ये बदल

ज्योतिर्मय साहित्य

- नाक बंद होणे, शिंक येणे आणि ॲलर्जी वाढू शकते.
- थकवा, अशक्तपणा किंवा कामात उत्साह कमी वाटू शकतो.
- काही लोकांमध्ये मूडमध्ये बदल किंवा चिडचिड वाढू शकते.
- हवेत आर्द्रता वाढल्याने घाम नीट वाफ होत नाही, त्यामुळे चिकटपणा जाणवतो.
- श्वसनाचे आजार (दमा, ब्राँकायटिस) वाढण्याची शक्यता असते.
- हृदयविकार असलेल्या व्यक्तींनी थंड हवामानात जास्त काळजी घ्यावी.
- काहींना एकाग्रता कमी होणे किंवा सुस्ती जाणवू शकते.
- थंड पदार्थ खाल्ल्यास दातांची संवेदनशीलता वाढू शकते.
- जखमा भरून येण्यास थोडा जास्त वेळ लागू शकतो.
- डोळ्यांत खाज, पाणी येणे किंवा ॲलर्जी होऊ शकते.
- ओले बूट किंवा मोजे जास्त वेळ घातल्यास पायांना दुर्गंधी व बुरशीचा संसर्ग होऊ शकतो.
- बाहेरचे उघड्यावरचे अन्न खाल्ल्यास पोटाचे विकार होण्याचा धोका वाढतो.

तब्येत चांगली ठेवण्यासाठी:

- गरम व ताजे अन्न खा.
- कोमट पाणी प्या आणि पुरेसे पाणी पिणे सुरू ठेवा.
- पावसात किंवा थंडीत भिजल्यास लगेच कोरडे कपडे घाला.
- नियमित व्यायाम करा.
- पुरेशी झोप घ्या.
- फळे, भाज्या आणि व्हिटॅमिन असलेले पदार्थ आहारात ठेवा.
- गरम सूप, हळदीचे दूध, आले-तुळशीचा चहा यांसारखी पेये आराम देऊ शकतात.
- पावसात भिजल्यानंतर लगेच आंघोळ करून कोरडे कपडे घातल्यास आजारांचा धोका कमी होतो.
- हात स्वच्छ धुणे आणि स्वच्छ पाणी पिणे संसर्ग टाळण्यासाठी महत्त्वाचे आहे.
- उकळून किंवा शुद्ध केलेले पाणी पिणे अधिक सुरक्षित असते.
- संत्री, मोसंबी, आवळा, पेरू यांसारखी व्हिटॅमिन सि असलेली फळे रोगप्रतिकारक शक्तीसाठी उपयुक्त आहेत.
- गरम सूप, कडधान्ये आणि प्रथिनेयुक्त आहार शरीराला ऊर्जा देतात.
- दररोज ७८ तास झोप घेतल्याने शरीराची प्रतिकारशक्ती चांगली राहते.
- हलका व्यायाम किंवा चालणे शरीर सक्रिय ठेवते.
- बाहेर जाताना रेनकोट, छत्री आणि गरजेनुसार उबदार कपडे वापरावेत.
- त्वचा कोरडी पडू नये म्हणून मॉइश्चरायझर लावावा.
- पाऊस थांबल्यावर थोडा वेळ सूर्यप्रकाशात राहिल्यास व्हिटॅमिन डी मिळण्यास मदत होते.
- ताप, श्वास घेण्यास त्रास किंवा सतत खोकला २३ दिवसांपेक्षा जास्त राहिल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

टिप: ''पावसाळ्यात चव महत्त्वाची आहे, पण आरोग्य त्याहून महत्त्वाचे. स्वच्छता, संतुलित आहार आणि नियमित व्यायाम हीच उत्तम प्रतिकारशक्तीची गुरुकिल्ली आहे.''

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### महादेव

श्रावण महिन्यात पहा
सर्वजण करतात पूजा
मनोभावे भोळ्या महादेवाची
घरातील वातावरण प्रसन्न
आरास असे शिवलींगावर
बेल,श्वेत पुष्पांची

महादेवाचा उपवास करुनी
पूजा अर्चना करताना
बेल मनोभावे अर्पिते
शुभ्र पुष्पांची आरास
भोवताली छान करता
शिवलींग मनोहर दिसते

# संस्कृत दिनानिमित्त शहरात संस्कृत नाट्य स्पर्धेचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : संस्कृत दिनानिमित्त श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था व महर्षी शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी संस्कृत नाट्य स्पर्धा स. भु. शिक्षण संस्थेच्या गोविंदभाई श्रॉफ ललित कला केंद्राच्या नाट्यगृहात शनिवार दिनांक २९ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित केली होती. संस्कृत भाषेच्या प्रचार प्रसारासाठी ही स्पर्धा मागील १६ वर्षा पासून आयोजित केली जात आहे.

संस्कृत नाट्य महोत्सवाचे उद्घाटन एस. बी. सेन्टेनरी शाळेचे प्रिन्सिपल श्री राहुलजी मोहनपूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महर्षी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष श्री प्रमोद जी देव यांनी स्वीकारले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे माजी अध्यक्ष श्रीयुत श्रीकांत पत्की यांनी केले.

याप्रसंगी महर्षी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. एस. एम. कुलकर्मी, श्री. लक्ष्मीकांत धोंड, सौ. माधुरी धोंड, शुभदा धांडे, श्रीपाद पदे, उदय कहाळेकर यांची उपस्थिती होती.




संस्कृत नाट्य महोत्सवात शहरातील १४ शाळांच्या संघांनी आधुनिक आणि प्राचीन विषयांना हात घालत अतिशय उत्कृष्ट नाट्य सादरीकरण केले. उपहारगृहात स्वच्छता आणि भेसळ यांचे विदारक दृश्य दाखवणारी नाटिका ''जागरूको भव'' महर्षी विद्यालयाच्या संघाने सादर केली तर पालकांनी कुटुंबात मुलांशी संवाद साधला पाहिजे यावर प्रकाश टाकणारी नाटिका ''प्रत्यक्ष संभाषण कुर्म:'' डॉ. देसरडा पब्लिक स्कूलने सादर केली.

महोत्सवाच्या दुसऱ्या सत्रात शहरातील प्रसिद्ध उद्योजक श्रीयुत आदित्य जी धाराशीवकर व त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रश्मी धाराशिवकर यांनी मनोगत व्यक्त करून मार्गदर्शन केले. यांच्या शुभहस्ते विजेत्या संघाला पारितोषिक वितरण करण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष स्थान महर्षी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीयुत एस एम कुलकर्णी यांनी स्वीकारले तर संस्कृत नाट्य महोत्सव समितीचे अध्यक्ष आदरणीय श्री लक्ष्मीकांत धोंड यांनी प्रास्ताविक सादर केले. कार्यक्रमासाठी शहरातील संस्कृत तज्ञ श्रीमती सुधा न्यायाधीश, श्रीमती सुवर्णा दंडे व अभिनयात निपुण श्रीमती वृषाली चाटोरीकर यांनी नाट्य परीक्षण केले.

संस्कृत नाट्य महोत्सवामध्ये प्रथम क्रमांक आलेल्या ''प्रत्यक्ष संभाषण कुर्म: '' डॉ. देसरडा पब्लिक स्कूलच्या नाटकाला रोख रुपये पाच हजार एक, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

द्वितीय क्रमांक आलेल्या ''स्वकर्म एव स्वधर्म:'' एस बी ओ ए स्कूलच्या नाटिकेला रोख रुपये ३००१ स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

तृतीय क्रमांक आलेल्या ओंकार विद्यालयच्या ''महर्षी अष्टावक्र'' या नाटिकेला रोख रुपये २००१ स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार महर्षी विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी वैष्णवी गोपाल गालापुरे हिला रोख रुपये पाचशे एक

उत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार ओंकार विद्यालयाचा विद्यार्थी शुभंकर विद्यासागर देशपांडे याला रोख रुपये ५०१

उत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार श्री शारदा मंदिर कन्या प्रशालेच्या वैशाली धामणगावकर यांना रोख रुपये पाचशे एक

उत्कृष्ट संहिता लेखनाचा पुरस्कार रोख रुपये १००१ व स्मृतिचिन्ह श्रीमती शुभदा धांडे यांच्या ''स्वधर्म एव स्वकर्म:'' या नाटिकेला मिळाला.

पहिल्या सत्राचे सूत्रसंचालन श्रीमती वैशाली कुलकर्णी व पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचलन श्रीमती मनिषा नवपुते यांनी केले. महर्षी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती उषा मालोदे, किलबिल प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री अंकुश तांबे सर्व शिक्षक वृंदांच्या सहकार्याने नाट्य महोत्सव संपन्न झाला.



# प्रा. यास्मिन शेख व चित्रकार श्रीधर अंभोरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : ज्येष्ठ व्याकरणतज्ज्ञ, लेखिका व मराठी भाषा-अभ्यासाच्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या प्रा. यास्मिन शेख तसेच प्रसिद्ध चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या निधनाबद्दल भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, जिल्हा शाखा छत्रपती संभाजीनगर, साहित्य भारती, छत्रपती संभाजीनगर आणि त्रैमासिक तिफिन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्रद्धांजली सभा भावपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

राष्ट्रमाता जिजाऊ चौक, एन-२, ठाकरेनगर येथील ग्रामविकास भवनात झालेल्या या सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. वासुदेव मुलाटे होते.

प्रा. यास्मिन शेख यांनी मराठी व्याकरण, शुद्धलेखन, भाषाभ्यास आणि मराठी भाषा विकासाच्या क्षेत्रात दिलेल्या प्रदीर्घ व मोलाच्या योगदानाचे यावेळी स्मरण करण्यात आले. त्यांच्या निधनामुळे मराठी भाषा-अभ्यासाच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. तसेच चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या निधनाने चित्रकला क्षेत्राची मोठी हानी झाली असून, त्यांच्या कुंचल्यातून साकारलेले कलाविश्व आणि त्यांचे सर्जनशील योगदान सदैव स्मरणात राहील, असे मान्यवरांनी नमूद केले.

यावेळी डॉ. सर्जेराव जिगे, उमेश काळे, डॉ. नागेश अंकुश आणि डॉ. हबीब भंडारे यांनी मनोगत व्यक्त करून प्रा. यास्मिन शेख व श्रीधर अंभोरे यांच्या कार्याला उजाळा दिला.

कार्यक्रमास शेषराव पठाडे, संजय प्र. गायकवाड, दिवाकर कुलकर्णी, डॉ. चक्रधर गायकवाड ,विजय पोहनेरकर, मोहन वाव्हाळ, संदीप वानखेडे, अमोल गायकवाड, नरहरी शिवपुरे, डॉ. दैवत सावंत, सुनीता कपाळे, प्रिया धारूरकर, मनोहर बसवाला, डॉ. तृप्ती रोंदे, सविता कुलकर्णी आणि दिपाली कुलकर्णी यांच्यासह साहित्य, भाषा, कला व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील डोके यांनी केले. सूत्रसंचालन विजयकुमार पांचाळ यांनी केले, तर आभार डॉ. संजय शिंदे यांनी मानले.

उपस्थितांनी दिवंगत प्रा. यास्मिन शेख आणि चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या साहित्यिक, भाषिक व कलाक्षेत्रातील योगदानाबद्दल कृतज्ञतापूर्वक आदरांजली वाहिली.

# कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे राधा कृष्ण सजवा स्पर्धा

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - दरवर्षी प्रमाणे कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे राधा, कृष्ण यांचे लहानग्या मुलां-मुलींना रूप देऊन (१ महिना ते १० वर्ष पर्यंत) स्पर्धा मधे भाग घेण्याची विनंती आहे. ही स्पर्धा कुलस्वामिनी मंगल कार्यालय येथे दिनांक ३ सप्टेंबर सायंकाळी ५ ते ७.३० पर्यंत होणार आहे. या वेळी मुलाकडून दही हंडी फोडण्यात येईल. प्रवेश सर्वांना मोफत असून भाग घेणाऱ्या सर्व मुलांना बक्षिसे देण्यात येणार आहे. विशेष १० बक्षिसेही सर्वोत्कृष्ट राधा कृष्ण-ड्रेसिंग साठी देण्यात येणार आहे.

या उपक्रमाचे आयोजन कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे सौ. अलका व विलास कोरडे यांचे मार्फत असून, अविराज कोरडे हे प्रोजेक्ट डायरेक्टर आहेत.



# जेष्ठांनो जीवनशैली बदला अन नैराश्यावर मात करा -धोंडीरामसिंह राजपूत

**ज्योतिर्मय साहित्य**

वैजापूर - वृद्धापकाळात येणारी नैराश्यता एक मानसिक आरोग्य स्थिती आहे, आयुष्याच्या संध्याकाळी अनेक जेष्ठ नागरिकाना शारिरीक, मानसिक,भावनिक, वैचारिक दुर्बलता येऊन एकटेपणा व नैराश्य जाणवते या स्थितीतून बाहेर येण्यासाठी जेष्ठ नागरिकांनी आपली जीवन शैली बदलली तर अंतिम काळातील नैराश्यावर सहज मात करून आनंदी जीवन जगता येते असे वक्तव्य जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी रविवार (ता,३०) रोजी वैजीनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघ च्या जेष्ठ नागरिक सभेत काढले, त्यांनी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केल्या बद्धल त्यांचा विशेष सत्कार या सभेत करण्यात आला त्या प्रसंगी ते बोलत होते, ते पुढे म्हणाले की,झेपेल तेव्हढे व्यायाम करावे, आवडीचे छंद जोपासावे, कोडे सोडवावे,उलटे पाढे मोजावे, मैत्री वाढवावी तसेच शारीरिक हालचाली करून निरोगी रहावे असेही ते पुढे म्हणाले. या प्रसंगी अध्यक्षस्थानी जेष्ठ नागरिक रवींद्र आप्पा साखरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठतम नागरिक गोलालदास आसर,




काशिनाथशेठ गायकवाड, पी.जी. श्रीवास्तव व श्री गणोरे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम आरंभी भारतमाता प्रतिमा पूजन झाले ज्या जेष्ठ नागरीक सभासदांचे वाढ दिवस जुलै व ऑगस्ट महिन्यात होते त्यांचे गुलाब पुष्प व शाल देऊन जेष्ठांच्या हस्ते अभिष्टचिंतन करण्यात आले. जेष्ठ नागरिक व कोषाध्यक्ष सुरेश संत, सह सचिव संपतराव डोंगरे, संचालक बबनराव क्षीरसागर, बाबासाहेब गायकवाड, सुभाष शेठ बोहरा, भगवानसिंह राजपूत, जवाहर कोठारी यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. संपतराव डोंगरे यांनी आभार मानले, बबनराव क्षीरसागर,बाबासाहेब गायकवाड यांनी सक्रिय सहकार्य केले. शहरातील जेष्ठ नागरिक पी.वाय.चव्हाण, सुदाम गोंधळे, नारायण लाडवाणी, कृष्णा कांबळे, सुभाष चाफेकर, विद्याधर सोनवणे, सुभाष पोंदे,कृष्णा वानखेडे, पंढरीनाथ शेलार व बहुसंख्य जेष्ठ नागरिक उपस्थित होते.




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे. मो. 95030 45495



### प्रेमातून धर्माकडे-श्रीकृष्णावताराचे रहस्य

पुढे....

चला, आपण सर्वजण श्रीकृष्णाच्या चरणी अशी प्रार्थना करू—

"हे नाथ! आम्हाला बासरीचे माधुर्य दे, जेणेकरून आमच्या वाणीने प्रेम फुलेल; आणि सुदर्शनाचा विवेक दे, जेणेकरून आमच्या जीवनातून अधर्माचा अंधार दूर होईल. आमचे मन भक्तिमय, बुद्धी धर्ममय आणि कर्म लोककल्याणकारी होवो."

भगवान श्रीकृष्णांच्या हातातील बासरी आणि सुदर्शनचक्र ही दोन वेगवेगळी प्रतीके नाहीत; ती सनातन धर्माची दोन परस्परपूरक रूपे आहेत.

बासरी शिकवते – प्रेम करा, भक्ती करा, अंतःकरण निर्मळ ठेवा.

सुदर्शनचक्र शिकवते – सत्यासाठी उभे राहा, धर्माचे रक्षण करा, अन्यायाला कधीही शरण जाऊ नका.

ज्या समाजात केवळ प्रेम असते पण धर्मनिष्ठा नसते, तो समाज दुर्बल होतो. आणि ज्या समाजात केवळ शक्ती असते पण करुणा नसते, तो समाज क्रूर बनतो.

म्हणूनच भगवान श्रीकृष्णांनी जगाला प्रेमाची बासरी आणि न्यायाचे सुदर्शन—दोन्ही दिले.

चला, आज आपण सर्वजण एक संकल्प करू—

"माझ्या विचारात गीता असो, माझ्या हृदयात भागवत असो, माझ्या आचरणात धर्म असो आणि माझ्या जीवनात श्रीकृष्ण असोत."

शेवटी भगवद्गीतेतील हे अमर वचन स्मरूया —

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥
(भगवद्गीता १८.७८)

जिथे योगेश्वर श्रीकृष्ण आहेत आणि जिथे कर्तव्यनिष्ठ अर्जुन आहे, तिथेच श्री, विजय, ऐश्वर्य आणि धर्मनिष्ठ नीती यांचा वास असतो.

॥ जय श्रीकृष्ण । जय भगवान परशुराम ।
जय जय रघुवीर समर्थ ॥

कृतज्ञ मी कृतार्थ मी 🙏
भगवंत हृदयस्थ आहे 🙏



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### काका (कुटुंबाचा भक्कम आधारस्तंभ)

पुढे.....

दुर्दैवाने ऐनवेळी कुटुंबातील कर्ता पुरुष म्हणजे मुलांचे वडील जग सोडून गेले, तर विस्कटलेल्या घराला सावरणारे आणि वडिलांची जागा घेऊन पुतण्या-पुतणीचा स्वतःच्या मुलांप्रमाणे सांभाळ करणारे अनेक काका आपण समाजात पाहिले आहेत. मुलांचे शिक्षण, त्यांचे संस्कार आणि त्यांच्या पायावर उभे राहीपर्यंत स्वतःचे सुख बाजूला ठेवून कर्तव्य निभावणारे काका हे ' पितृतुल्य ' असण्याचे खरेखुरे प्रमाण असतात.

आपल्या संस्कृतीत 'काका' हे संबोधन रक्ताच्या नात्यापलीकडेही आदराने दिलं गेलं आहे. समाजासाठी आणि राष्ट्रासाठी झटणाऱ्या थोर व्यक्तींना समाजाने प्रेमाने 'काका' किंवा 'काकासाहेब' म्हणून गौरवले आहे. वारकरी संप्रदायातील थोर संत गोरोबा कुंभार यांना आपण आदराने 'गोरोबा काका' म्हणतो, तर संपूर्ण जीवन समाजासाठी अर्पण करून स्वदेशीचा पुरस्कार करणारे गणेश वासुदेव जोशी 'सार्वजनिक काका' म्हणून ओळखले जातात. थोर गांधीवादी विचारवंत व लेखक काका कालेलकर, स्वातंत्र्यलढ्यातील नेते व साहित्यिक काकासाहेब गाडगीळ, टिळकांचे विश्वासू सहकारी व झुंजार पत्रकार काकासाहेब खाडिलकर, तसेच बालकांवरील प्रेमापोटी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू हे 'चाचा (काका) नेहरू' म्हणूनच जनमानसात अमर झाले. (क्रमश:)

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### संयम - मोठ्या विजयाचं शांत सामर्थ्य

आयुष्यात काही गोष्टी कितीही मनापासून हव्या असल्या, तरी त्या लगेच मिळत नाहीत.
कधी मेहनत करूनही यश मिळत नाही...
कधी मनापासून प्रेम करूनही समोरच्याला आपली किंमत कळत नाही... कधी प्रामाणिक राहूनही चुकीचा माणूस पुढे जाताना दिसतो...
आणि तेव्हा मनात एकच प्रश्न येतो "माझ्याच वाट्याला एवढी परीक्षा का?"
याच क्षणी माणसाची खरी परीक्षा सुरू होते.
कारण प्रयत्न करणं सोपं असतं... पण प्रयत्न करत राहून परिणामाची वाट पाहणं कठीण असतं.
हीच वाट पाहण्याची ताकद म्हणजे संयम.
संयम म्हणजे गप्प बसणं नव्हे. संयम म्हणजे कमजोरी नव्हे. संयम म्हणजे अन्याय सहन करणंही नव्हे. संयम म्हणजे योग्य वेळ येईपर्यंत स्वत:वर आणि आपल्या प्रयत्नांवर विश्वास ठेवण्याची ताकद.
आज तुम्ही जे प्रयत्न करत आहात, त्याचा परिणाम उद्याच दिसेल असं नाही.
कधी कधी तुमची मेहनत जमिनीखाली रुजत असते... फक्त तिचं फळ अजून दिसत नसतं.
म्हणूनच काही लोक पहिल्या अपयशानंतर थांबतात.
काही लोक दुसऱ्या अपयशानंतर.
आणि काही जण शेवटच्या क्षणापर्यंत टिकून राहतात. इतिहास त्यांचाच लिहिला जातो.
कारण प्रतिभेपेक्षा सातत्य आणि वेगापेक्षा संयम अनेकदा मोठा विजय मिळवून देतो.
संयमाची खरी परीक्षा नात्यांमध्ये होते.
आपल्या माणसाने काहीतरी चुकीचं बोललं की आपण लगेच उत्तर देतो.
रागाच्या एका क्षणात शब्द बाहेर पडतात.
आणि नंतर कितीही पश्चात्ताप केला तरी ते शब्द परत येत नाहीत. पण जर त्या क्षणी आपण फक्त काही क्षण शांत राहिलो असतो... कदाचित एक नातं वाचलं असतं. कधी कधी उत्तर न देणं हेही उत्तर असतं. कधी शांत राहणं म्हणजे पराभव नसतो... ते नातं जपण्याचं धैर्य असतं.
रागातून घेतलेला निर्णय आणि संयमातून घेतलेला निर्णय यात आयुष्यभराचा फरक असतो.
राग म्हणतो— "आत्ताच कर!"
संयम म्हणतो "थांब... आधी विचार कर."
राग दार बंद करतो.संयम खिडकी उघडी ठेवतो.
राग नातं तोडतो. संयम नात्याला आणखी एक संधी देतो. राग क्षण जिंकतो... संयम आयुष्य जिंकतो.
"संयम म्हणजे शांत बसून नशिबाची वाट पाहणं नाही; तर मनापासून प्रयत्न करत राहून योग्य वेळेवर विश्वास ठेवणं होय. काही स्वप्नं उशिरा पूर्ण होतात, काही नाती उशिरा समजतात आणि काही जखमा उशिरा भरतात. पण त्यासाठी स्वतःला दोष देऊ नका. तुमची मेहनत आज कुणाला दिसत नसेल, तरी ती उद्याच्या विजयाची बीजं पेरत असते.
रागाच्या क्षणी थांबा, दुःखाच्या क्षणी स्वतःला सावरून घ्या आणि अपयशाच्या क्षणी स्वतःला एकच सांगा—'अजून संपलेलं नाही.' कारण कधी कधी आपण ज्या क्षणी हार मानण्याचा निर्णय घेतो, त्याच क्षणाच्या पलीकडे आपला विजय उभा असतो.जेव्हा तुम्ही अपमानाच्या आणि अपयशाच्या आगीत स्वतःला संयमाने तावून-सुलाखून निघू द्याल आणि योग्य वेळ येताच यशाचा असा कडकडाट कराल की संपूर्ण जग हादरून जाईल, तोच तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठा 'विजय' असेल.उतावळेपणा सोडा, संयमाचे शांत सामर्थ्य अंगी बाणा... आणि 'विचार ते विजय' या प्रवासात महाविजयाचे धनी व्हा!

# क्रांतीकारक भाई भगवान सिंग ज्ञानी

**ज्योतिर्मय साहित्य**
(मागील अंकावरून)

टोकियोच्या इंपीरियल युनिव्हर्सिटीमध्ये भाषांचे प्राध्यापक असलेल्या मौलवी बरकतुल्ला यांच्याशी पुन्हा एकत्र येण्यासाठी भाई भगवान सिंग ज्ञानी जपानला पळून जाण्यात यशस्वी झाले. शस्त्रे आणण्याच्या गरजेमुळे भाई ज्ञानी यांना जपान सोडून जर्मनीला जावे लागले. शांघायजवळ जहाजाने प्रवास करत असताना ते एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या हाती लागले. पण त्याच्या हातून निसटून २३ मे १९१४ रोजी बरकतुल्ला सोबत सॅन फ्रान्सिस्कोला ते पोहोचले. १९१४ मध्ये गदर पक्षाचे दुसरे अध्यक्ष म्हणून भाई भगवान सिंग ज्ञानी यांची निवड करण्यात आली. गदर चळवळीचा उदय हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या प्रवासातील एक अत्यंत महत्वाचा टप्पा होता. १९१३ साली अमेरिकेतील भारतीय स्थलांतरितांनी, विशेषतः पंजाबी मजुरांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध संघटीत बंडाची तयारी सुरू केली. गदर चळवळीचे वैशिष्ठ असे कि, ती भारतातील मर्यादित राजकीय वर्तुळाबाहेर जाऊन जगभर पसरलेल्या भारतीयांना एकत्र आणू पहात होती. अमेरिका, कॅनडा, आशिया, युरोप सिंगापूर, मलाया आणि अन्य ठिकाणी काम करणाऱ्या भारतीयांमध्ये बिटिश सत्तेविषयी जो असंतोष होता त्याचे राजकीय जागृतीत रुपांतर करण्याचे काम गदर पक्षाने केले. भाई भगवान सिंग ज्ञानी यांच्यासारख्यांनी गदर पक्षाचे नेतृत्व केले. भाई ज्ञानी यांनी भारतीय तरुणांमध्ये १९१३ साली स्थापन झालेल्या गदर चळवळीचे नेतृत्व आल्यानंतर स्वाभिमान, राष्ट्रभक्ती आणि बंडखोरीची भावना अधिक प्रमाणात वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी गदर पक्षाच्या सभा, चर्चासत्रे, पत्रव्यवहार आणि गुप्त बैठकी यांना वेग देत सक्रीय सहभाग नोंदविला. त्यांच्या कार्यामुळे गदर चळवळीला केवळ घोषणांचा नव्हे, तर संघटनेचा अधिक आधार लाभला. गदर पक्षाने १५ ऑगस्ट १९१४ रोजी भारतातील ब्रिटिश राजवटीविरुद्ध उघड युद्धाची आणि भारताला स्वतंत्र व सार्वभौम प्रजासत्ताक बनविण्याची घोषणा केली. यामधील भाई ज्ञानी यांचा सहभाग महत्वाचा. आयरिश स्वातंत्र्यसैनिक आणि भारतीय स्वातंत्र्य सेनानी रासबिहारी बोस यांची भाई भगवान सिंग ज्ञानी यांनी भेट घेतली आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी इतर देशांचा उपयोग करून घेण्यासाठी योजना तयार केल्या. पहिल्या महायुद्धाच्या काळात १९१५ च्या गदर कटात भारतातील स्वातंत्र्यलढ्यासाठी भाई ज्ञानी मोठ्या प्रमाणावर सामील झाले आणि हा कट अयशस्वी झाल्यानंतर जपानला पळून गेले. १९१४ ते १९२० या काळात गदर पक्षाचे अध्यक्ष म्हणून त्यांची कारकिर्द भारतीय स्वातंत्र लढ्यासाठी दैदिप्यमान ठरली. हिंदू- जर्मन कट हा पहिल्या महायुद्धाच्या काळात जर्मनीच्या मदतीने भारतात सशस्त्र उठाव घडवून आणण्याचा गदर पक्षाचा व्यापक प्रयत्न होता. भाई भगवान सिंग ज्ञानी यांनी परदेशातील भारतीय क्रांतीकारकांना संघटीत करणे, गदरचा प्रचार करणे, भारतात परतणाऱ्या कार्यकर्त्यांना स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रेरित करणे आणि ब्रिटीशांविरुद्ध उठावासाठी मनुष्यबळ व साधने उभी करणे या



कामात सहभाग घेतला. भाई ज्ञानी यांच्या राष्ट्रवादी कविता हिंदुस्थान गदर मध्ये प्रसिद्ध होत असत. त्यापैकी काही नंतर गदर की गुंज मध्ये संकलित झाल्या. जर्मनीकडून शस्त्रे, पैसा आणि राजनैतिक मदत मिळविण्याच्या गदरच्या योजनांशी त्यांचा संबंध व्यापक हिंदू-जर्मन कटाचा भाग होता.




१९१५ चा उठाव ब्रिटिश गुप्तहेरांच्या कारवायांमुळे तसेच संघटनेतील फितुरीमुळे आणि नियोजन उघड झाल्यामुळे अपयशी ठरला. त्यानंतर ब्रिटिश सरकारने गदर नेत्यांवर देशद्रोह, राजद्रोह आणि युध्दकाळातील कटकारस्थानांचे आरोप ठेऊन मोठ्या प्रमाणावर कारवाई केली. भाई भगवान सिंग ज्ञानी हे हिंदू-जर्मन कटातील महत्वाचे गदर नेते होते. ते जपानला निसटून गेल्यामुळे इतर गदर क्रांतीकारकांप्रमाणे त्यांच्यावर भारतात तात्काळ खटला आणि मृत्युदंड भाई भगवान सिंग ज्ञानी यांना भोगावा लागला नाही.

अमेरिकेच्या तटस्थता कायद्याचे उल्लंघन केल्याबदल १९१७ मध्ये सॅन फ्रान्सिस्को कट प्रकरणात भाई ज्ञानी यांना इतर १९ भारतीयांसह अटक करण्यात आली आणि त्यांना दोन वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यांना भारतात पाठवण्याची ब्रिटिश सरकारची विनंती अमेरिकन शासनातर्फे फेटाळण्यात आली. १९२८ मध्ये गदर पक्ष भाई भगवान सिंग ज्ञानी यांनी सोडल्यानंतर त्यांनी विविध विषयांवर अनेक पुस्तके लिहिली. ज्यात जगण्याची कला, शाश्वत तारुण्याचे शास्त्र, मैत्रीचा आदर्शमानव शास्त्राच्या नोंदी, परिपूर्णतचे मार्ग, माणसे का अयशस्वी होतात, जंग और आझादी, एकाग्रता, प्रेम विवाह आणि घटस्फोट, अधोमनाची रहस्ये आणि कार्ये, योगी व्यायाम, माणसाचा सर्वात मोठा शत्रू, तुम्हाला घडवणारे आणि मोडणारे अन्न, सृजनशील ज्ञान, आत्म संकृती आणि आहार तक्ता यांचा समावेश आहे.

१९४७ मध्ये भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंजाबचे मुख्यमंत्री प्रतापसिंग कैरो यांच्या विनंतीवरून भाई भगवान सिंग ज्ञानी हे १९५८ साली आपल्या मातृभूमीत परतले. भाई ज्ञानी हे महान स्वातंत्र्यसैनिक रासबिहारी बोस आणि त्यांचे आयरिश समकालीन डेव्हलेरा यांचेही जवळचे सहकारी होते. त्यांच्या पत्नी १९५० च्या दशकाच्या सुरवातीला त्यांच्या अनुपस्थितीत निधन पावल्या. आपल्या मुलीसोबत तसेच आपले मित्र पंजाबचे मुख्यमंत्री प्रतापसिंग कैरो यांचेबरोबर भारतात रहात असताना भाई ज्ञानी यांनी आपल्या कुटुंबासाठी स्पातू रस्त्यावर काही मालमत्ता खरेदी केली होती, जी आजही त्यांच्या कुटुंबाकडे आहे. ८ सप्टेंबर १९६२ रोजी भाई भगवान सिंग ज्ञानी यांचे आपल्या मातृभूमीमध्ये निधन झाले. गदर परंपरेतील नेतृत्व करणाऱ्या या महान स्वातंत्र्य सेनानीचे साहित्य, कविता आपल्या देशाच्या तरुण पिढीला स्फूर्ती देत राहतील.

***

# बळीराम पाटील विद्यालयाच्या २००३ च्या बॅचचा 'एक हात मदतीचा

## बालनिरीक्षण गृहातील बालकांसाठी खेळाचे साहित्य व अन्नदान

**ज्योतिर्मय साहित्य**



छत्रपती संभाजीनगर - बळीराम पाटील विद्यालयाच्या २००३ च्या बॅचमधील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सामाजिक बांधिलकी जपत एक हात मदतीचा या उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर येथील बालनिरीक्षण गृह / बालसुधार गृहातील बालकांसाठी विविध खेळाचे साहित्य तसेच एका दिवसाच्या भोजनाचे अन्नदान करून सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श निर्माण केला.

शालेय जीवनातील मैत्रीचे ऋण जपत तब्बल २३ वर्षांनंतरही एकमेकांशी जोडलेले असलेल्या २००३ च्या बॅचमधील मित्र-मैत्रिणींनी एकत्र येत हा उपक्रम राबविला. समाजातील गरजू बालकांना आनंदाचे क्षण मिळावेत, त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी आणि खेळाच्या माध्यमातून त्यांच्यात उत्साह व सकारात्मकता निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी बालनिरीक्षण गृहातील बालकांसाठी मोठ्या प्रमाणात खेळाचे साहित्य देण्यात आले. त्यामध्ये ३ बॅट, १० बॉल, ३ चेस सेट, १० ल्युडो सेट, २ कॅरम बोर्ड यासह इतर आवश्यक खेळाचे साहित्य देण्यात आले. विविध वयोगटातील बालकांना खेळता यावे आणि त्यांच्या आवडी-निवडीनुसार खेळ उपलब्ध व्हावेत, याचा विचार करून साहित्याची निवड करण्यात आली. तसेच बालकांसाठी एका दिवसाच्या भोजनाचे अन्नदान करण्यात आले.

या उपक्रमामुळे बालनिरीक्षण गृहातील बालकांना खेळण्यासाठी आवश्यक साधने उपलब्ध होण्याबरोबरच त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न झाला. शिक्षणासोबतच खेळ, मनोरंजन आणि सकारात्मक वातावरण हे बालकांच्या विकासासाठी महत्त्वाचे असून, त्या दृष्टीने माजी विद्यार्थ्यांनी केलेला हा उपक्रम विशेष उल्लेखनीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक संदिप सोनवणे, ग्रामसेवक विशाल वानखेडे, डॉ. निलेश पारखे, आशिष इंगळे, शिवराज पाटील, रितेश वाहुळे, दीपक लंके, सुनील गायकवाड, योगेश पाटील व प्रवीण कावळे यांनी विशेष परिश्रम घेतले.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संदिप सोनवणे यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी २००३ च्या बॅचच्या मैत्रीचे सामाजिक कार्यात रूपांतर करण्यामागील भूमिका स्पष्ट केली. 'आपण ज्या समाजात वाढलो, त्या समाजातील गरजू घटकांसाठी आपल्या परीने काहीतरी योगदान देणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे,' असा संदेश त्यांनी यावेळी दिला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ग्रामसेवक विशाल वानखेडे यांनी केले. त्यांनी या उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे आभार मानत भविष्यातही अशाच प्रकारचे सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. या संपूर्ण उपक्रमासाठी बळीराम पाटील विद्यालयाच्या २००३ च्या बॅचमधील तब्बल ४० मित्र-मैत्रिणींचे मोलाचे सहकार्य लाभले. अनेक वर्षांपूर्वी शाळेत एकत्र शिकलेल्या मित्र-मैत्रिणींनी पुन्हा एकत्र येत केवळ जुन्या आठवणींना उजाळा न देता समाजातील गरजू बालकांसाठी मदतीचा हात पुढे केला.मैत्री जपली, आठवणी जपल्या आणि माणुसकीची नाळही जपली', या भावनेतून राबविण्यात आलेल्या 'एक हात मदतीचा' उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. माजी विद्यार्थ्यांच्या या सामाजिक उपक्रमातून 'जिथे गरज आहे, तिथे मदतीचा हात द्या' हा प्रेरणादायी संदेश समाजासमोर आला.

# संवादाअभावी कुटुंबाची आणि समाजाची बदलणारी स्थिर संतुलनाची दिशा!

**ज्योतिर्मय साहित्य**
(मागील अंकावरून)



त्या शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची अत्यंत उत्कृष्ट गुणवत्ता निर्माण होते. त्या संस्थेतून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी मोठमोठ्या आयटी कंपन्यात खूप उच्च पदावर कार्यरत होतात. तसेच, जिल्हाधिकारी व आयुक्त पदावर कार्यरत होतात. त्यासाठी, पालकांना खूप मोठी रक्कम फी म्हणून व डोनेशन स्वरुपात त्या शिक्षण संस्थेला द्यावी लागते. त्या मुलांमुलींचे पालक पंचवीस,पन्नास लाख रुपये कोटा येथील कॉलेजमध्ये भरतात. तसेच, मुलाला/मुलीला सांगतात आम्ही तुमच्यासाठी होते नव्हते ते सर्व पैसे तुमच्या शैक्षणिक भवितव्यासाठी खर्च केले आहेत. आता तुमची जबाबदारी आहे. अत्यंत उत्कृष्ट कौशल्याने तुम्ही परिक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. याची जाणीव ठेवा अशी अपेक्षा पालक मुलांमुलींकडून ठेवतात. त्यांच्यावर मानसिक दडपण आणतात. पाल्याचे पैसे भरले म्हणजे त्यांचं काम झालं असं पालक समजतात. अशावेळी पाल्यांना त्यांनी मानसिक आधार देणे अत्यंत आवश्यक असते. पण, ते तसं करीत नाहीत. याचा परिणाम मुलामुलींच्या मनावर व अभ्यासावर होतो. त्यांना कमी मार्क्स पडले की, त्या मुलामुलीना नैराश्य येतं. मग, त्यांच्या मनात आत्महत्येचे विचार येऊ लागतात. त्यातूनच, मग ते टोकाचं पाऊल उचलतात. सन २०२४ व सन २०२५मध्ये झालेल्या राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार




अशा विद्यार्थी व विद्यार्थिनी मिळून २४जणांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे. कोटाच्या कॉलेजमधून शिक्षण घेवून विद्यार्थ्यांनी उच्च पदांवर नोकरी करत कोट्यवधी रुपये कमावत अशी पालकांची अपेक्षा, इच्छा असते. पण, पालकांनी इथे हे

लक्षात घेतले पाहिजे की , मुलें म्हणजे काही पैसै कमविणारी मशिन नाही. आजच्या संगणकीय जगात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे अनेक संगणकीय उच्च दर्जाचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यांचा विचार व आपल्या पाल्याच्या कुवतीचा, मनाचा विचार पालकांनी करणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरून पाल्याचं सुख ते आपलं व आपल्या कुटुंबाचं सुख हे पालकांनी समजून घेतलं पाहिजे. तरंच, कुटुंबाचं सुख व्यवस्थित राहिल.

उपरोक्त घटनेने एका कुटुंबाचे नव्हे,तर सर्व समाजाचे आत्मपरीक्षण होणे आवश्यक आहे. यासाठी,सर्व कुटुंबातील पतीपत्नी,आईबाबा

पालक, सासू सासरे,राज्य शासन म्हणजे सर्व मंत्रीमंडळ, सर्व आमदार व विरोधी पक्षातील सर्व आमदार तसेच, राज्य शासनाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय यंत्रणांतील कर्मचारी व अधिकारी, सर्व महामंडळे, गरीब मुलांमुलींसाठीची सर्व वसतीगृह संचालक,व कर्मचारी यांनीही आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. कुटुंबात जसे आईबाबा कुटुंब

प्रमुख असतात. तसे, राज्याचे कुटुंब प्रमुख मुख्यमंत्री असतात व त्यांचे घटक हे उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे कुटुंब सदस्य आहेत. प्रत्येकांनी आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडली पाहिजे. तरंच, कुटुंबाकुटुंबाचे व महाराष्ट्रकुटुंबाचे ख-या अर्थाने संरक्षण होईल.

तसेच, सर्वांना सुखसमाधान लाभेल यात कुणाचेही दूमत असण्याचे कारण नाही.

## पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण(भाग-२)

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्-bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३



### पुराणांची रचना, पंचलक्षणे आणि व्यापक आशय

पुराणांचे स्वरूप समजून घेताना त्यांच्या रचनेची पारंपरिक संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. 'पुराण' हा शब्द एका विशिष्ट ग्रंथापुरता मर्यादित नसून अनेक ग्रंथांचा आणि दीर्घकाळ विकसित झालेल्या एका साहित्यपरंपरेचा निर्देश करतो. आज प्रामुख्याने अठरा महापुराणे आणि अठरा उपपुराणे अशी परंपरागत विभागणी केली जाते. तथापि, या ग्रंथांची निर्मिती, संपादन आणि पुनर्रचना एकाच काळात किंवा एकाच लेखकाने झाली असे मानता येत नाही. विविध कालखंडांत विविध सामग्री या ग्रंथपरंपरेत समाविष्ट होत गेली असण्याची शक्यता आहे.

पुराणांच्या आशयाची पारंपरिक ओळख करून देताना पंचलक्षणे अत्यंत महत्त्वाची ठरतात. 'सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वंतर आणि वंशानुचरित' हे पाच विषय पुराणाच्या मूलभूत स्वरूपाचे निदर्शक मानले जातात. विष्णुपुराणासह मत्स्यपुराण आणि इतर पुराणग्रंथांमध्ये या संकल्पनेचे उल्लेख आढळतात.

सर्ग म्हणजे आदिसृष्टीची निर्मिती. विश्वाची सुरुवात कशी झाली, मूलभूत तत्त्वांपासून विविध घटकांची निर्मिती कशी झाली, देव, प्राणी आणि जगाची रचना कशी झाली, यासंबंधीच्या कल्पना सर्गाच्या अंतर्गत येतात. अर्थात, येथे मांडलेली विश्वनिर्मिती ही आधुनिक भौतिकशास्त्रातील 'बिग बँग'सारख्या सिद्धांताशी तंतोतंत समान आहे असे म्हणणे योग्य ठरणार नाही. दोन्हींची भाषिक, तात्त्विक आणि ज्ञानमीमांसात्मक चौकट भिन्न आहे.

प्रतिसर्ग ही त्यानंतरची संकल्पना आहे. सृष्टीचा विनाश आणि त्यानंतर तिची पुनर्निर्मिती किंवा पुनरावृत्ती अशी तिची व्यापक कल्पना आहे. भारतीय कालदृष्टीचे एक वैशिष्ट्य येथे दिसून येते- विश्वाला एकदाच निर्माण होऊन कायमचे अस्तित्वात राहणारी रचना न मानता, निर्माण, स्थिती आणि लय यांचे आवर्तनशील चक्र मानले जाते.

वंश या संकल्पनेत देव, ऋषी आणि राजघराण्यांच्या परंपरांचा मागोवा घेतला जातो. भारतीय परंपरेतील अनेक राजवंश, विशेषत: सूर्यवंश आणि चंद्रवंश, यांचे उल्लेख पुराणांमध्ये आढळतात. त्यामुळे पुराणे ही धार्मिक आख्यानांसोबतच प्राचीन भारतीय सांस्कृतिक स्मृती जतन करणारी साधनेही ठरतात.

मन्वंतर ही भारतीय कालगणनेतील वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना आहे. प्रत्येक मन्वंतर एका विशिष्ट मनूशी संबंधित मानले जाते. मन्वंतरांच्या माध्यमातून अत्यंत विशाल कालखंडांची कल्पना मांडली जाते. भारतीय परंपरेतील कालदृष्टी किती व्यापक आणि दीर्घकालीन आहे, याची जाणीव या संकल्पनेतून होते.
(क्रमश:)

# ज्ञानज्योतीचा प्रेरणादायी प्रवास

**ज्योतिर्मय साहित्य**

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्या डॉ. कविता नरसिंहराव गिते यांची वाटचाल

२९ वर्षांच्या अविरत शैक्षणिक सेवेला राष्ट्रीय सन्मान

बीड जिल्ह्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविणाऱ्या अनेक व्यक्तींमध्ये प्रा. डॉ. कविता नरसिंहराव गिते यांचे नाव आज अभिमानाने घेतले जात आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी, विशेषतः कामगार कुटुंबांतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत त्यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान होणारा हा सन्मान त्यांच्या २९ वर्षांच्या समर्पित शैक्षणिक सेवेचा गौरव आहे.

साने गुरुजी निवासी संस्थेतून सेवेला नवी दिशा

प्रा. डॉ. कविता गिते या बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ, केज संचलित साने गुरुजी निवासी संस्थेच्या मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. गेली २९ वर्षे त्यांनी या विद्यालयात अध्यापन व शैक्षणिक नेतृत्वाची जबाबदारी सांभाळली



आहे.

सन १९९७ पासून त्यांनी या क्षेत्रात कार्याला सुरुवात केली. ऊसतोड कामगारांच्या कुटुंबातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, त्यांच्या आयुष्यात शिक्षणाचा प्रकाश पोहोचावा आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आत्मविश्वासाने उभे राहता यावे, या ध्येयाने त्यांनी आपल्या कार्याची दिशा निश्चित केली.

कामगारांचे स्थलांतर हे या भागातील वास्तव. कामाच्या शोधात कुटुंबे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असताना त्यांच्या मुलांचे शिक्षण खंडित होण्याची शक्यता मोठी असते. ही परिस्थिती जवळून अनुभवल्यानंतर ''या मुलांचे शिक्षण थांबता कामा नये'', हा विचार डॉ. गिते यांच्या कार्याचा केंद्रबिंदू बनला.

शिक्षणासोबत संस्कारांचीही शिदोरी

डॉ. गिते यांच्यासाठी शिक्षण म्हणजे केवळ परीक्षा आणि गुण नव्हेत. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवेदनशीलता, स्वावलंबन, सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना निर्माण करणे हेही शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे, असा त्यांचा दृष्टिकोन आहे.

विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेऊन त्यांच्याशी संवाद साधणे, पालकांशी संपर्क ठेवणे आणि शिक्षणाच्या प्रवाहात मुलांना टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे, या माध्यमातून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना नवी दिशा दिली.

विद्यार्थीकेंद्रित अध्यापनावर भर

आजच्या बदलत्या शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता अनुभवातून आणि कृतीतून शिकले पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे.

विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, स्वतःचे मत मांडण्याची, प्रयोग करण्याची आणि स्वतंत्रपणे विचार करण्याची संधी देणे, ही त्यांच्या अध्यापनाची वैशिष्ट्ये आहेत. प्रत्येक मुलाची शिकण्याची क्षमता आणि गती वेगळी असते, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचणारे अध्यापन असावे, यासाठी त्या प्रयत्नशील राहतात.




पालकांशी संवादाची प्रभावी पद्धत

विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे पालकांशी सातत्याने संवाद साधण्यावर त्यांनी विशेष भर दिला. **(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559